॥ श्री ॥
आपली भूमी.. आपला आवाज...
# वीरभूमी
संपादक : महादेव दळे

✻ सुविचार ✻
कर्म हीच पूजा आहे, आणि
प्रामाणिकपणा हीच खरी स्पिरिट आहे.

अहिल्यानगर | शुक्रवार, दि. १४ ऑगस्ट २०२६ | वर्ष ७ वे | अंक ६५ वा | पाने ४ | किंमत ३ रुपये | RNI No. MAHMAR / 2012 / 47715 | 9420802145 | www.veerbhuminews.com

# खड्ड्यांमुळे उद्योगांवर 'स्थलांतर' संकट!

## २० उद्योग स्थलांतरीत होण्याच्या निर्णयाने प्रशासनाची धावपळ

**पुणे । वीरभूमी–**
खड्डयांनी चाळण झालेले रस्ते, दिवसेंदिवस वाढत चाललेली वाहतूक कोंडी आणि त्याचा उद्योग व्यवसायावर होणारा गंभीर परिणाम यामुळे चाकण औद्योगिक परिसरातील उद्योजकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. या समस्यांना कंटाळून चाकण एमआयडीसी परिसरातील सुमारे २० लघुउद्योजकांनी आपले उद्योग अन्यत्र स्थलांतरित करण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आल्यानंतर प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली आहे.

दरम्यान ज्या ज्या लोकांनी आवाज उठवला त्यांना काही लोकांनी फोन करत तुम्ही आवाज का उठवत आहात, तुम्हाला अडचण येऊ शकते, धंद्याला अडचणी येऊ शकतात, काही लोकांना धमक्या दिल्या गेल्याचे कळते आहे असा आरोप आमदार रोहित पवार यांनी केला आहे. रोहित पवार म्हणाले की, एमआयडीसीचे रस्ते अत्यंत खराब आहे, त्यामुळे अपघात होतात, वेळ जास्त लागतो, वाहनं खराब होतात, लोकं वेळेवर पोहचत नाही. बाहेरच्या कंपन्या जर इथे येत अशी परिस्थिती बघणार असतील तर ते बाहेर राज्यात जाण्याचाच विचार करतील. काही कंपन्या बंद झाल्याने त्यांच्या रोजगारांचा प्रश्न निर्माण झाला आहे.

सरकारवर दबाव आला तर सरकार काम करते त्यामुळे सर्व उद्योजकांनी एकत्र येत दबाव निर्माण केला पाहिजे, आम्ही तुमच्यासोबत आहोत. चाकण हे राज्यातील महत्त्वाच्या ऑटोमोबाईल आणि औद्योगिक केंद्रांपैकी एक आहे. या परिसरात मोठ्या संख्येने उत्पादन करणाऱ्या कंपन्या व लघुउद्योग आहेत. मात्र, गेल्या काही काळापासून खराब रस्ते आणि वाहतूक कोंडीचा फटका उद्योगांना बसत आहे. कच्चा माल वेळेत कारखान्यांपर्यंत पोहोचविणे, तयार माल बाजारपेठेत पाठविणे तसेच कामगारांची ये-जा यामध्ये मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. वाहतूक कोंडीमुळे वाहनांचा वेळ व इंधनाचा खर्च वाढत असून, उत्पादन आणि पुरवठा साखळीवरही त्याचा परिणाम होत असल्याचे उद्योजकांचे म्हणणे आहे.

रस्ते आणि वाहतूक कोंडीच्या समस्येमुळे सुमारे २० लघुउद्योजकांनी उद्योग अन्यत्र हलविण्याचा निर्णय घेतल्याची माहिती समोर आली आहे. हा निर्णय केवळ काही उद्योगांचा प्रश्न नसून चाकणच्या औद्योगिक भवितव्याबाबतचा गंभीर इशारा मानला जात आहे.

उद्योगमंत्री उदय सामंत दि. १६ ऑगस्ट रोजी चाकण औद्योगिक परिसरातील विविध प्रश्नांचा पाहणी व आढावा घेण्यासाठी येणार असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे त्यांच्या दौऱ्यापूर्वीच जिल्हाधिकारी आणि एमआयडीसी अधिका-यांनी प्रत्यक्ष परिस्थितीची पाहणी केल्याने प्रशासनाच्या हालचालींना वेग आला आहे.

दुसरीकडे एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र सिंह कुशवाहा आणि जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी चाकण औद्योगिक क्षेत्राची पाहणी केली. औद्योगिक क्षेत्रातील रस्ते आणि वाहतूक सुविधांच्या प्रलंबित कामांना गती देण्याचे निर्देश यावेळी देण्यात आले. या पाहणीदरम्यान, चाकण औद्योगिक क्षेत्रातील अंतर्गत रस्त्यांची दुरुस्ती आणि अपूर्ण काँक्रिटीकरणाची कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी कुशवाहा यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.



### कंपन्या बंद झाल्याचा आभास : मुख्यमंत्री फडणवीस

राज्यातून उद्योग किंवा कंपन्या बंद झाल्याचा केवळ आभास निर्माण केला जात असून, प्रत्यक्षात बंद झालेल्या कंपन्यांपैकी ७६ टक्के कंपन्या या डिफंक्ट म्हणजेच कधीही सुरू न झालेल्या आहेत. १२ टक्के कंपन्यांचे इतर कंपन्यांमध्ये एकत्रीकरण होते, तर केवळ २ टक्के कंपन्या विसर्जित होतात. २०१९-२० मध्ये केंद्र सरकारने विशेष मोहीम राबवून निष्क्रिय असलेल्या तब्बल ६ लाख कंपन्या स्ट्राइक ऑफ केल्या होत्या. त्यामुळे उद्योग बंद पडल्याचा दावा पूर्णपणे दिशाभूल करणारा आहे.

### उद्योगांचे स्थलांतर होणे गंभीर बाब : शरद पवार

गेल्या ५ वर्षांत महाराष्ट्रातील तब्बल ३६,२११ खासगी कंपन्या बंद पडल्याची माहिती समोर आली. याच आकडेवारीचा आणि चाकण एमआयडीसीतून मूलभूत सुविधांच्या अभावामुळे २० कंपन्या स्थलांतरित होत असल्याचा संदर्भ देत, शरद पवार यांनी राज्य सरकारला धारेवर धरले होते. हा यशवंतराव चव्हाणांचा महाराष्ट्र असून उद्योगांचे असे स्थलांतर होणे राज्याला भूषणावह नाही अशी टीका राष्ट्रवादी (श. प.) नेते शरद पवारांनी केली होती.

# संसदेचे कामकाज संस्थगित

**नवी दिल्ली । वीरभूमी–**
पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी लोकसभेचे कामकाज केवळ एक मिनिट चालले. सभापती ओम बिरला यांनी वंदे मातरम् गाण्याचा आदेश दिला आणि त्यानंतर कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब केले. पीएम मोदी-शाह, संपूर्ण मंत्रिमंडळ आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी लोकसभेत उपस्थित होते. दुसरीकडे आज संसद परिसरात सत्ताधारी आणि विरोधी पक्षांच्या खासदारांनी आंदोलन केले.

संसदेचे पावसाळी अधिवेशन २० जुलै रोजी सुरू झाले होते. सुरुवातीपासूनच संसदेचे पावसाळी अधिवेशन वादळी ठरले. अधिवेशन सुरू झाल्यापासून जंतरमंतर येथील आंदोलनात विद्यार्थ्यांवर झालेली पोलिस कारवाई आणि राम मंदिरातील लुटीवरून विरोधी पक्षांनी हल्लाबोल केला. अधिवेशनाच्या अखेरपर्यंत विरोधकांनी विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्याचा मुद्दा लावून धरत लाठीहल्ल्याचा आदेश नेमका कुणी दिला, याचे उत्तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सभागृहात द्यावे, अशी मागणी केली. यावरून संसदेत आणि संसदेबाहेर सत्ताधारी आणि विरोधकांत संघर्ष पाहायला मिळाला. अखेरच्या दिवशी तरी गृहमंत्री उत्तर देतील, अशी अपेक्षा होती. परंतु अखेरच्या दिवशी आज लोकसभेचे कामकाज केवळ १ मिनिट चालले. त्यानंतर कामकाज संस्थगित करण्यात आले. त्यामुळे विरोधक आक्रमक झाले.

लोकसभेत सकाळी कामकाजाची सुरुवात गदारोळात झाली. परंतु नंतर वंदे मातरमच्या घोषणेने काही काळासाठी शांतता प्रस्थापित झाली. पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांचेही आज आगमन झाले. तथापि, त्यानंतर सभागृहाचे कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आले. दरम्यान, झारखंडमध्ये विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्जच्या विरोधात एनडीएच्या खासदारांनी आंदोलन केले. राज्यसभेत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी उत्तराखंडमधील हल्द्वानीत त्यांच्या कार्यक्रमानंतर झालेल्या शुद्धीकरणाचा मुद्दा उपस्थित केला. सभागृहात एमएमडीआर दुरुस्ती विधेयक मंजूर करण्यात आले. यानंतर कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आले.

लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनात १९ बैठका झाल्या. सभागृहाचे कामकाज साधारणपणे सकाळी ११ ते सायंकाळी ६ पर्यंत चालते. दुपारी १ ते २ या वेळेत जेवणाची सुटी असते. याचा अर्थ दिवसाला अंदाजे ६ तासांचे कामकाज चालते. यानुसार १९ बैठकांमध्ये अंदाजे ११४ तासांचे कामकाज होणे अपेक्षित होते. परंतु केवळ सुमारे १७ तास आणि ३० मिनिटांचेच कामकाज झाले. याचा अर्थ अंदाजे ९६ तास आणि ३० मिनिटे कामकाज कमी झाले.

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी एनडीए आणि विरोधी पक्षांच्या खासदारांमधील संघर्ष सुरूच होता. गुरुवारी दोन्ही बाजूंचे खासदार एकमेकांशी भिडले, ज्यामुळे जोरदार घोषणाबाजी झाली. सुरक्षा रक्षक ढालीप्रमाणे मध्ये उभे होते.

## SPOT NEWS

### स्वातंत्र्यदिनी दहशतवादी हल्ल्याचा इशारा

**नवी दिल्ली** – येत्या १५ ऑगस्ट रोजी संपूर्ण देश ८० वा स्वातंत्र्यदिन साजरा करण्याच्या तयारीत असतानाच सुरक्षा यंत्रणांनी दहशतवादी हल्ल्याचा इशारा दिला आहे. येत्या दोन-तीन दिवसांत दहशतवादी हल्ल्याचा प्रयत्न होऊ शकतो, अशी शक्यता गुप्तचर यंत्रणांनी वर्तवली आहे. या इशाऱ्यानंतर सुरक्षा यंत्रणा अलर्ट मोडवर आल्या असून कश्मीरपासून दिल्लीपर्यंत हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. गुप्तचर यंत्रणांच्या माहितीनुसार आयएसआय आणि खलिस्तान समर्थक घटकांशी संबंधित पाकिस्तानस्थित एक नेटवर्क दिल्ली-एनसीआरमधील साथीदारांना आयईडी पोहोचवण्याचा प्रयत्न करू शकते. यामुळे सुरक्षा यंत्रणांनी दिल्ली-एनसीआरमध्ये सुरक्षा उपाययोजना अधिक कडक केल्या आहेत. गुप्तचर यंत्रणांकडून मिळालेल्या माहितीनुसार फरहतुल्ला घोरी याचे नावही समोर आले आहे. घोरी हा पाकिस्तानात वास्तव्यास असून भारतातील मोस्ट वॉन्टेड दहशतवादी मानला जातो. २००२ मध्ये गुजरातमधील अक्षरधाम मंदिरावर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात सहभागी असल्याचा घोरीवर आरोप आहे. सुरक्षा यंत्रणा बऱ्याच काळापासून त्याच्या हालचालींवर लक्ष ठेवून आहेत.

### सर्वसामान्यांना वीजदरवाढीचा शॉक

**मुंबई** – उन्हाळ्यामध्ये सर्वसामान्य ग्राहकांना वीजदरवाढीचा मोठा आर्थिक फटका सहन करावा लागला. पावसाळा सुरू झाल्यानंतर वीजबील कमी येइल या आशेवर वीजग्राहक बसले होते. मात्र महावितरणाने एक मोठा निर्णय घेतला असून पुन्हा एकदा सामान्यांच्या खिशाला कात्री बसणार आहे. वीज वापरणाऱ्या ग्राहकांच्या ऑगस्ट महिन्याच्या बिलाचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. जुलै महिन्यात झालेल्या वीज वापरासाठी महावितरणने इंधन समायोजन शुल्क लागू केले आहे. त्यामुळे घरगुती ग्राहकांसह व्यावसायिक, औद्योगिक आणि इलेक्ट्रिक वाहन वापरणाऱ्यांना प्रत्येक युनिटमागे अतिरिक्त रक्कम भरावी लागणार आहे. वापराच्या स्लॅबनुसार या शुल्काची रक्कम वेगवेगळी असेल. यंदाच्या उन्हाळ्यात राज्यातील विजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली होती. वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी महावितरणला काही प्रमाणात महागड्या दराने वीज खरेदी करावी लागली. या अतिरिक्त वीजखरेदीचा खर्च भरून काढण्यासाठी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार इंधन समायोजन शुल्क आकारण्यात येत असल्याचं महावितरणकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. घरगुती वीज वापराच्या श्रेणीनुसार ग्राहकांवर वेगवेगळ्या प्रमाणात शुल्क आकारलं जाणार आहे. दारिद्र्यरेषेखालील ग्राहक: १० पैसे प्रति युनिट, १०० युनिटपर्यंत वापर: २० पैसे प्रति युनिट, १०१ ते ३०० युनिट: ४० पैसे प्रति युनिट, ३०१ ते ५०० युनिट: ५० पैसे प्रति युनिट, ५०० युनिटपेक्षा अधिक वापर: ६० पैसे प्रति युनिट असे दर असणार आहेत. इलेक्ट्रिक वाहनधारकांनाही या निर्णयाचा परिणाम जाणवणार आहे. ई-व्हीकल चार्जिंग स्टेशनसाठी प्रति युनिट ३० पैसे इंधन समायोजन शुल्क लागू करण्यात आलं आहे. त्यामुळे इलेक्ट्रिक वाहन चार्ज करण्याचा खर्चही वाढण्याची शक्यता आहे.

# नांदेडमध्ये माजी उपमुख्यमंत्र्यांवर प्राणघातक हल्ला; रुग्णालयात दाखल

**नांदेड । वीरभूमी–**
महाराष्ट्रातील नांदेडमध्ये माजी उपमुख्यमंत्री सुखबीरसिंग बादल यांच्यावर प्राणघातक हल्ला झाला आहे. त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार करण्यात येत आहेत. शिरोमणी अकाली दलाचे अध्यक्ष आणि पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीर सिंग बादल यांच्यावर नांदेडमध्ये प्राणघातक हल्ला झाला. या हल्ल्यात जखमी झालेल्या बादल यांना खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. नांदेड शहरापासून जवळच असलेल्या माता साहेब गुरुद्वारा परिसरात हा हल्ला करण्यात आला. हल्लेखोर कोण होते याबाबत अद्याप माहिती मिळू शकलेली नाही. हल्लेखोरांचा शोध घेण्यात येत आहे.माजी उपमुख्यमंत्री सुखबीर सिंग बादल यांच्यावर गुरुवारी नांदेडच्या गुरुद्वाराच्या परिसरात हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात ते जखमी झाले आहेत. या हल्ल्यात त्यांच्या सुरक्षा व्यवस्थेत तैनात असलेला एक पोलीस अधिकारीही जखमी झाला आहे. बादल यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सकाळी बादल यांनी आपल्या कुटुंबीयांसोबत गुरुद्वारात जाऊन दर्शन घेतलं.

पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री आणि शिरोमणी अकाली दलाचे प्रमुख सुखबीरसिंह बादल यांच्यावर नांदेड येथे झालेल्या हल्ल्याच्या घटनेची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नांदेड पोलीस अधीक्षक यांच्याकडून माहिती घेतली आहे. या घटनेत आरोपीला तात्काळ अटक केली असून कोणत्या उद्देशाने हा हल्ला झाला, याची चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत.सुखबीर सिंह बादल यांची प्रकृती चांगली आहे, असल्याची माहिती देखील देण्यात आली आहे.

पंजाबचे माजी उपमुख्यमंत्री सुखबीरसिंग बादल याच्यावर हल्ला करणारा व्यक्ती वकील आहे. आरोपी जसपालसिंग याचं वय ६२ वर्ष आहे. तो मूळचा पुणे येथील आहे. जसपालसिंग पुणे न्यायालयात वकील होता. मागील २ वर्षांपासून नांदेड जवळील मुगट येथील मातासाब गुरुद्वारात तो सेवा करत आहे. आज सुखबीरसिंग बादल मातासाब गुरुद्वारातुन दर्शन बाहेर पडताच जसपालसिंग यानं हल्ला केला. जसपालसिंग याला जागेवरूनच अटक करण्यात आलं असून पोलीस चौकशी सुरु आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या घटनेसंदर्भात माहिती घेतली आहे. बादल यांच्यावर हल्ला करणाऱ्या आरोपीला अटक करण्यात आली आहे. हल्लेखोरानं नेमक्या उद्देशानं हल्ला केला याची माहिती पोलिसांकडून घेतली जात आहे. देवेंद्र फडणवीस यांनी सुखबीर सिंह बादल यांच्यासोबत फोनवरुन चर्चा केली, यावेळी बादल यांच्या प्रकृतीची विचारपूस देखील केली. मिळालेल्या माहितीनुसार सुखबिरसिंह बादल यांची प्रकृती स्थिर आहे.

# मनपा कर्मचारी धीरज परदेशी मृत्यू प्रकरण; आणखी एकाला अटक

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
महापालिकेच्या विद्युत विभागातील कंत्राटी कर्मचारी धीरज कचरूसिंग राजपूत-परदेशी यांच्या निर्घृण हत्येप्रकरणी दाखल गुन्ह्यात आणखी एकाचा सहभाग पोलिसांच्या तपासात समोर आला आहे. मुख्य संशयित आरोपींना मदत केल्याच्या आरोपावरून इम्रान मुसा सय्यद (रा. सिव्हील कॉलनी, मुकुंदनगर) याला भिंगार कॅम्प पोलिसांनी गुरूवारी (१३ ऑगस्ट) अटक केली. न्यायालयाने त्याला १७ ऑगस्टपर्यंत चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

धीरज राजपूत-परदेशी हे मुकुंदनगर परिसरातील दर्गा दायरा येथे पथदिव्यांच्या दुरूस्तीचे काम करीत असताना त्यांच्यावर हल्ला करण्यात आला होता. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर उपचार सुरू असतानाच ९ ऑगस्ट रोजी त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर शहरात संतप्त प्रतिक्रिया उमटल्या होत्या. भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात या प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.

या प्रकरणातील मुख्य संशयित मुस्तकीम ख्वाजामिया सय्यद, मेहराज इब्राहिम सय्यद आणि सिराज इब्राहिम सय्यद (तिघेही रा. आलमगीर, भिंगार) यांना पोलिसांनी हैदराबाद येथून ताब्यात घेतले होते. त्यांना पळून जाण्यास मदत केल्याच्या आरोपावरून ख्वाजामिया उर्फ अकरम याकुब सय्यद (रा. आलमगीर) आणि वसीम रहिम सय्यद (रा. फकीरवाडा, मुकुंदनगर) यांनाही नगरमधून अटक करण्यात आली. याशिवाय महापालिकेचा वायरमन युनूस खान यालाही पोलिसांनी अटक केली आहे. या सर्वांकडे सध्या पोलिसांकडून कसून चौकशी सुरू आहे.

तपासादरम्यान मुख्य संशयित तिघांना इम्रान सय्यद याने मदत केल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली. मुख्य संशयितांना त्याने नेमकी कोणत्या स्वरूपाची मदत केली, हत्येच्या घटनेशी त्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध आहे का, तसेच घटनेनंतर आरोपींना लपण्यासाठी अथवा पळून जाण्यासाठी त्याने कोणती मदत केली, याचा तपास पोलीस कोठडीत केला जाणार आहे. दरम्यान, या गुन्ह्यात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही पोलिसांकडून शोध सुरू आहे. त्यामुळे तपासात आणखी काही नावे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# नगर शहरात काळ्या काचा असणाऱ्या ५६ गाड्यांवर कारवाई, १५२ गुन्हे दाखल

## अहिल्यानगर जिल्हा वाहतूक शाखेची मोठी कारवाई

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
दिनांक १३/८/२०२६ रोजी दुपारी १२ ते १४ वाजताचे दरम्यान पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या सूचनेनुसार जिल्हा वाहतूक शाखेने शहरात विशेष मोहीम राबवून मोठी कारवाई केली आहे.

डीएसपी चौकात लावण्यात आलेल्या विशेष नाकाबंदीदरम्यान, केंद्रीय मोटार वाहन कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या तब्बल १५२ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. यामध्ये बेकायदेशीरपणे काळ्या काचा (ब्लॅक फिल्म) लावून फिरणाऱ्या ५६ फोर व्हीलर गाड्यांचा समावेश आहे



पोलिसांनी केंद्रीय मोटार वाहन कायद्यांतर्गत एकुण १५२ कारवाया केल्या. यामध्ये ५६ चारचाकी वाहनांच्या काळ्या फिल्म जागीच काढून दंडात्मक कारवाई करण्यात आली. ही कारवाई डीएसपी चौक आणि शहरातील इतर विविध चौकात केली आहे.

ही धडक मोहीम माननीय पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, आणि उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा व शहर वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक महेश पाटील आणि त्यांच्या पथकाने यशस्वीरित्या राबवली.

शहरातील वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी आणि गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी वाहतूक पोलिसांची ही विशेष मोहीम यापुढेही अशीच सुरू राहणार असल्याची माहिती जिल्हा वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे विचार जागरुक ठेवणे आवश्यक

## सभापती प्रा.राम शिंदे । पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर २३१ वी पुण्यतिथी समारोह

**अहिल्यानगर । वीरभूमी–**
पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या कार्यातून लोककल्याण, न्याय, समता, महिला सक्षमीकरण, धर्मनिरपेक्षता आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श समाजासमोर ठेवला. त्यांचे विचार आणि कार्य आजच्या पिढीपर्यंत पोहोचविणे तसेच त्यांच्या विचारांची जागरूकता समाजात कायम ठेवणे ही काळाची गरज असल्याचे विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर २३१ वी पुण्यतिथी समारोह चौंडी येथे आयोजित करण्यात आला होता.त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी डॉ अण्णासाहेब डांगे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

सभापती प्रा शिंदे म्हणाले की, अहिल्यादेवी होळकर यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत राज्यकारभाराची धुरा



समर्थपणे सांभाळत जनतेच्या कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य दिले. प्रजेच्या सुख-दुःखाची जाण ठेवणाऱ्या या लोकमातेने सार्वजनिक सुविधांच्या विकासासाठी उल्लेखनीय कार्य केले. त्यामुळे त्यांचे कार्य लोककल्याणकारी शासनव्यवस्थेचा आदर्श ठरले आहे. सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळावा, गरजूंच्या अडचणी दूर व्हाव्यात आणि समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगता यावे, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. प्रशासनात पारदर्शकता, कर्तव्यनिष्ठा आणि संवेदनशीलता असावी, हा संदेश त्यांच्या कार्यातून आजही मिळतो असेही ते म्हणाले.

नव्या पिढीला अहिल्यादेवींच्या कार्याची ओळख करून देण्यासाठी शाळा-महाविद्यालयांमध्ये त्यांच्या जीवनकार्यावर आधारित उपक्रम, व्याख्याने, चर्चासत्रे, वाचन आणि विविध स्पर्धांचे आयोजन करण्याची आवश्यकता आहे. त्यांच्या विचारांचा अभ्यास करून 'लोककल्याण हेच खरे नेतृत्व' हा संदेश समाजमनात रुजविणे गरजेचे आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे विचार हे केवळ इतिहासाचा वारसा नसून आजच्या आणि उद्याच्या समाजासाठी मार्गदर्शक मूल्ये आहेत. न्याय, सेवा, संवेदनशीलता, कर्तव्यनिष्ठा आणि लोककल्याणाची भावना जागृत ठेवून त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे, हीच प्रत्येकाची जबाबदारी असल्याचेही ते म्हणाले.

डॉ. डांगे यावेळी म्हणाले की, अहिल्यादेवींनी देशाच्या विविध भागांतील धार्मिक व सांस्कृतिक स्थळांच्या विकासासाठीही मोठे योगदान दिले. मंदिरे, घाट, विहिरी, धर्मशाळा, रस्ते आणि यात्रेकरूंसाठी आवश्यक सुविधांची उभारणी करून त्यांनी सार्वजनिक हिताची व्यापक संकल्पना प्रत्यक्षात आणली. समाजातील विविध घटकांना जोडण्याचे आणि सांस्कृतिक वारसा जतन करण्याचे त्यांचे कार्य आजही महत्त्वपूर्ण आहे असेही ते म्हणाले.

# SPOT NEWS

## नवलेवाडीच्या स्वरा सोनवणेचे शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश

● **अकोले । वीरभूमी–**



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नवलेवाडी येथील इयत्ता चौथीतील विद्यार्थिनी स्वरा रवींद्र सोनवणे हिने पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे. स्वराने ३०० पैकी तब्बल २३६ गुण मिळवत जिल्हास्तरीय गुणवत्ता यादीत आपले स्थान निश्चित केले आहे.स्वराच्या या अलौकिक यशामागे तिचे कष्ट, आई–वडिलांचे प्रोत्साहन आणि शाळेतील शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन कारणीभूत ठरले. शिष्यवृत्ती परीक्षेच्या परिपूर्ण तयारीसाठी तिला जगताप मॅडम व गायकर सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. लेकीच्या या दैदिप्यमान यशावर स्वराचे वडील रवींद्र दगडू सोनवणे व आई अश्विनी सोनवणे यांनी अत्यंत आनंद व्यक्त केला आहे. या यशाबद्दल नवलेवाडी शाळेतील सर्व शिक्षक, पालक, व्यवस्थापन समिती आणि ग्रामस्थांच्या वतीने स्वराचे कौतुक व अभिनंदन करण्यात येत असून तिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी उज्वल शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

## शिष्यवृत्ती परीक्षेत आबासाहेब काकडे विद्यालयाचे यश

● **शेवगाव । वीरभूमी–**

आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या आबासाहेब काकडे विद्यालय, शेवगाव येथील विद्यार्थ्यांनी इयत्ता सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत आपल्या गुणवत्तेचा ठसा उमटवत नेत्रदीपक यश संपादन केले आहे. परीक्षेत ओमसाई विशाल सानप– २४२, वेदांत भाऊसाहेब शिंदे – २३४, आराध्या नीलकंठ आमले– २२६, आरुषी सुरेश भापकर– २१६ गुण मिळवत यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. विद्याधर काकडे, विश्वस्त हर्षदा काकडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी पृथ्वीसिंग काकडे, शैक्षणिक विभाग प्रमुख वंदना पुजारी, शिक्षण विभाग सहप्रमुख अशोक आहेर, प्राचार्य डॉ. लक्ष्मण बिटाळ, उपप्राचार्य अनिल मगर, पर्यवेक्षक लक्ष्मण गाडे, पंढरीनाथ पल्हारे, मोहिनी बडधे आदींनी अभिनंदन केले आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षेत रेसिडेन्शिअल हायस्कूलचे उज्वल यश

● **शेवगाव । वीरभूमी –**

जिल्हा मराठा संस्थेच्या रेसिडेन्शिअल हायस्कूल, शेवगाव या विद्यालयाने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्यामार्फत घेण्यात आलेल्या उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता ७ वीच्या एप्रिल २०२६ मध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत विद्यालयाचे ३९ विद्यार्थी पात्र झाले असून विद्यालयाचा शेकडा निकाल ४५.८८ टक्के लागला आहे. निकालाची वैशिष्ट्ये म्हणजे २०० पेक्षा अधिक गुण मिळविणारे ८ विद्यार्थी, १८० ते २०० गुण मिळविणारे ५ विद्यार्थी, तर १६० ते १८० गुण मिळविणारे १४ विद्यार्थी आहेत. शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी निर्घोष मिनीनाथ पिसे –२६०, रिदम रामेश्वर बोडखे – २३६,आदेश विजयकुमार आवारे– २२०, स्वरा सचिन दहिफळे–२२०, साईदीप रामदास पठाडे – २१६, सोहम ज्ञानेश्वर औटे–२१६ गुण मिळवत यश मिळवले आहे. या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थी तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या तज्ज्ञ शिक्षकांचे संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर साहेब, सचिव ड. विश्वासराव आठरे पाटील, सह–सेक्रेटरी मुकेश दादा मुळे, खजिनदार दिपलक्ष्मी म्हसे तसेच विद्यालयाचे प्राचार्य बालाजी गायकवाड, उपमुख्याध्यापक अविनाश रामफळे, पर्यवेक्षक महेश शिंदे, विभाग प्रमुख विजय शिंदे आदींनी अभिनंदन केले आहे.

## जय हिंद फाऊंडेशनचे कोल्हारच्या जिल्हा परिषद शाळेत २५ वृक्षांचे रोपण

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

जिल्ह्यात वृक्षारोपणाबरोबरच वृक्षसंवर्धनाची चळवळ प्रभावीपणे राबविणाऱ्या जय हिंद फाऊंडेशनच्या वतीने पाथर्डी तालुक्यातील कोल्हार येथील जिल्हा परिषद शाळेच्या परिसरात २५ वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपण करून केवळ कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, लावलेल्या प्रत्येक रोपाचे संगोपन करण्याची जबाबदारी विद्यार्थी व शिक्षकांनी स्वीकारली. त्यामुळे शालेय परिसर भविष्यात हिरवाईने नटविण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला.

## पुणतांबा येथील याज्ञसेनी देवी मंदिरासमोरील
# तीन समाधी शिलालेखांतून उलगडतो जाधवराव घराण्याचा इतिहास

**१८५४ ते १९५४ या शंभर वर्षांच्या कालखंडातील ऐतिहासिक नोंदी | देवजी बाबा, रामचंद्र आणि जाधवराव कुटुंबीयांच्या समाधींची माहिती**

■ **विजय उंडे**

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

जिल्ह्यातील राहाता तालुक्यात गोदावरी नदीच्या काठावर वसलेल्या पुणतांबा येथील भगवती याज्ञसेनी देवी मंदिरासमोरील तीन समाधी मंदिरांवरील शिलालेखांमधून स्थानिक इतिहासाची महत्त्वपूर्ण माहिती समोर आली आहे. या तीनही समाधी मंदिरांच्या मुख्य गाभाऱ्याच्या प्रवेशद्वारावरील गणेशपट्टीवर हे शिलालेख कोरण्यात आले आहेत. चार, पाच आणि सहा ओळींचे हे तीनही शिलालेख देवनागरी लिपीत आणि मराठी भाषेत असून त्यातील अक्षरे आजही ठळक व सुस्थितीत आहेत.

या शिलालेखांचा अभ्यास व वाचन अनिल किसन दुधाणे यांनी केले आहे. मंदिर अभ्यासक रोहन गाडेकर, कारण सोनी आणि ऋतिक लाहोटी यांच्या सहकार्याने हे संशोधन कार्य पूर्णत्वास गेले.

पहिल्या शिलालेखात देवजी बाबा यांच्या समाधीची नोंद आहे. शिलालेखातील ओळी पुढीलप्रमाणे आहेत–

**शिलालेखाचे वाचन : १**

**१. श्री**
**२.स्वस्ति श्री सकें १७७६ आनंदी**
**३.नाम सवछरे वैशाख शुद्ध ३ ते**
**४.दिनी दे(रा)वजी बाबा समाधि झाली.**

शालिवाहन शक १७७६, आनंदी नाम संवत्सर, वैशाख शुद्ध तृतीया या दिवशी देवजी बाबा यांची पुणतांबा येथे गोदावरीकाठी समाधी झाल्याची नोंद या लेखात आहे. ही तारीख ३० एप्रिल १८५४ अशी निश्चित होते. मात्र ही समाधी नेमकी कोणी बांधली, याचा उल्लेख शिलालेखात आढळत नाही.

दुसऱ्या शिलालेखातून बाजीराव यांच्या पुत्र रामचंद्र यांनी समाधी बांधल्याची माहिती मिळते.

**शिलालेखाचे वाचन : २**

**१.स्वस्ति श्री सक १८१७ मन्म**
**२.नाम संवछरे कार्तिक मा**
**३.से शुक्ल पक्षे तिथो ११ ग**
**४.बाजीराव तस्ये सुत रामचं**
**५.द्र यांनी करविले आसे**

या लेखानुसार शालिवाहन शक १८१७, मन्मथ नाम संवत्सर, कार्तिक शुक्ल पक्ष एकादशी या दिवशी बाजीराव यांचे पुत्र रामचंद्र यांनी पुणतांबा येथे गोदावरीकाठी समाधी बांधली. या लेखातून समाधी बांधणाऱ्या व्यक्तीचे नाव तसेच त्यांचे पितृनाम यांची माहिती मिळते.

तिसरा शिलालेख रामचंद्र महाराज जाधवराव यांच्या समाधीशी संबंधित असून त्यांच्या पुत्रांनी देवालय केल्याची माहिती देतो.

**शिलालेखाचे वाचन : ३**

**१.श्री**
**२.रामचंद्र महाराज यांची स**
**३.माधी विष्णू रामचंद्र शंकर**
**४.जाधवराव यांनी देवालय केले**
**५.शके १८७६ सन २०१० श्रावण**
**६.मि. व. १३ गुरुवार**




या लेखानुसार शालिवाहन शक १८७६, श्रावण वद्य त्रयोदशी, म्हणजेच १२ ऑगस्ट १९५४ रोजी रामचंद्र महाराज जाधवराव यांच्या समाधीचे देवालय त्यांच्या पुत्रांनी–विष्णू रामचंद्र जाधवराव आणि शंकर रामचंद्र जाधवराव–बांधले.

पुणतांबा येथील या शिलालेखांचा संबंध जाधवराव घराण्याच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी महत्त्वाचा ठरतो. राजे लखुजीराव जाधवराव यांच्या वंशजशाखेतील देऊळगाव राजा या शाखेतून पुढे विविध वंशजशाखा निर्माण झाल्या. त्यामध्ये माहेगाव देशमुख (कोपरगाव) आणि पैठणकर राजे जाधवराव या शाखांचाही समावेश होतो.

राव जगदेवराव राजे जाधवराव यांनी सन १६९४ मध्ये आपली वंशजशाखा सिंदखेडराजा येथून देऊळगाव राजा येथे स्थलांतरित केली. यशवंतराव राजे हे राव जगदेवराव राजे जाधवराव यांचे तिसरे पुत्र असून त्यांची वंशजशाखा कुंभारीकर जाधवराव म्हणून ओळखली जाते. ही शाखा कुंभारी (ता. कोपरगाव) येथून माहेगाव देशमुख येथे स्थलांतरित झाली. देशमुखी जहागिरीमुळे ही शाखा जाधवराव देशमुख या नावानेही ओळखली जाते.

मात्र पुणतांबा येथील तिसऱ्या




शिलालेखातील रामचंद्र महाराज, विष्णू रामचंद्र आणि शंकर रामचंद्र जाधवराव यांची माहेगावकर जाधवराव शाखेशी निश्चित वंशसाखळी जोडण्यासाठी स्वतंत्र वंशावळी, दप्तरातील कागदपत्रे, सनदा आणि अन्य समकालीन पुराव्यांचा अभ्यास आवश्यक असल्याचे संशोधकांचे मत आहे.

पुणतांबा हे गोदावरी नदीच्या काठावर वसलेले प्राचीन धार्मिक क्षेत्र आहे. येथील देवालये, समाधीस्थळे आणि शिलालेख स्थानिक धार्मिक व सामाजिक इतिहासाचा मागोवा घेण्यासाठी महत्त्वपूर्ण आहेत.

याज्ञसेनी देवी मंदिरासमोरील हे तीन समाधी शिलालेख विशेष महत्त्वाचे असून, १८५४ ते १९५४ या शंभर वर्षांच्या कालखंडातील समाधी–वास्तूंच्या निर्मितीचा मागोवा त्यातून घेता येतो. त्याचबरोबर समाधीधारक व्यक्ती, त्यांचे कौटुंबिक संबंध आणि पुढील पिढ्यांनी उभारलेल्या स्मारकांची माहितीही या शिलालेखांतून मिळते.

हे शिलालेख केवळ समाधींच्या निर्मितीच्या तारखा नोंदविणारे नसून, पुणतांबा परिसरातील धार्मिक परंपरा, स्थानिक कुटुंबांची सामाजिक भूमिका, पिढीजात स्मृती आणि जाधवराव घराण्याच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी महत्त्वपूर्ण ऐतिहासिक साधन ठरतात.

## ज्ञानवर्धिनी शाळेत पालकसभा उत्साहात
### विद्यार्थी गुणवत्ता, सुरक्षा व सुविधांवर पालकांच्या सूचना

● **अकोले । वीरभूमी–**

हिंद सेवा मंडळ संचलित ज्ञानवर्धिनी प्राथमिक शाळा व बालकमंदिर विभागाची पालकसभा मंगळवार, दि. ११ ऑगस्ट रोजी खेळीमेळीच्या वातावरणात उत्साहात संपन्न झाली. सभेला पालकांची उत्स्फूर्त उपस्थिती होती.



यावेळी ८० टक्के पालकांच्या उपस्थितीत शाळा व्यवस्थापन, सखी सावित्री, विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा आणि महिला तक्रार निवारण या चार समित्यांच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांची निवड करण्यात आली.

सभेच्या अध्यक्षस्थानी ज्ञानवर्धिनी बालकमंदिर विभागाचे चेअरमन अमोल वैद्य होते. विद्यार्थी, शिक्षक आणि पालक यांच्यातील समन्वय व सुसंवादामुळे शाळेची शैक्षणिक गुणवत्ता वाढते. बालवयात मिळालेले संस्कार विद्यार्थ्यांचे भविष्य आणि सामाजिक जाणीवा प्रगल्भ करतात, असे वैद्य यांनी सांगितले. पालकांच्या शंका, समस्या तसेच शैक्षणिक गुणवत्ता व भौतिक सुविधांसाठी भविष्यात प्रामाणिक प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

ज्ञानवर्धिनी शाळेसाठी धर्माधिकारी रंगमंच व पेव्हर ब्लॉक स्वखर्चातून उभारून देणारे श्री व सौ. सुरेखा मोरेश्वर धर्माधिकारी तसेच डॉ. सुधाताई देशपांडे यांच्या विशेष योगदानाबद्दल वैद्य यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी पालक संघाच्या अध्यक्षा डॉ. नीरजा कुलकर्णी, पूजा मोरे, भारती जोशी, नवनाथ पांडे, निखिल जगताप, हिरा बिडवे व काजल वैद्य यांनी क्षेत्रभेटीतून श्रमांचा आदर व स्वकौशल्य विकास, विद्यार्थ्यांचा अभ्यास, प्रतिकूल परिस्थितीत संघर्ष करणारे विद्यार्थी, भौतिक सुविधा, संगणक शिक्षण व डिजिटल क्लासरूम याबाबत मार्गदर्शक सूचना मांडल्या. त्यावर सर्वानुमते निर्णय घेण्यात आले.

संस्थेचे कार्यकारिणी सदस्य दिलीपभाई शहा, अकोले विभागाचे प्रशासकीय अधिकारी तथा माजी प्राचार्य संतोष कचरे, एकल महिला समितीच्या समन्वयक व मॉडर्न हायस्कूलच्या चेअरमन प्रतिमा कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी मॉडर्न ज्युनि. कॉलेज विभागाचे चेअरमन बाळासाहेब वडजे, ज्येष्ठ संचालिका डॉ. सुधाताई देशपांडे, सौ. पुष्पाताई वाणी, स्थानिक समिती सदस्य तथा पत्रकार अल्ताफ शेख आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ‘शिक्षणदीप’ हस्तलिखिताचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण
### बा. ह. नाईकवाडी व दुर्गाबाई नाईकवाडी यांच्या कार्याचा प्रेरणादायी जीवनप्रवास

● **अकोले । वीरभूमी –**

अगस्ती एज्युकेशन सोसायटीच्या मातोश्री दुर्गाबाई नाईकवाडी यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त अगस्ती विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या ‘शिक्षणदीप’ या हस्तलिखिताचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले.



गुरुवर्य बा. ह. नाईकवाडी आणि मातोश्री दुर्गाबाई नाईकवाडी या शिक्षण, संस्कार, समाजसेवा आणि मानवतेची मूल्ये जपणाऱ्या महान व्यक्तिमत्त्वांच्या कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने हे हस्तलिखित तयार करण्यात आले आहे. यात त्यांच्या जीवनप्रवासासह शैक्षणिक व सामाजिक कार्य, स्वातंत्र्यकाळातील योगदान, अगस्ती शिक्षण संस्थेची वाटचाल तसेच पुढील पिढीवर झालेल्या सकारात्मक प्रभावाचा आढावा घेण्यात आला आहे.

हस्तलिखितासाठी शिक्षक संजय पवार यांनी मार्गदर्शक म्हणून मोलाचे योगदान दिले. श्रुती नाईकवाडी संपादक, तर मैत्रेय सहाणे उपसंपादक म्हणून कार्यरत होते. नववी ‘ई’च्या विद्यार्थ्यांसह अनेक विद्यार्थ्यांनी संपादन, लेखन, सजावट आणि संकलन प्रक्रियेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

प्रकाशनप्रसंगी मान्यवरांनी गुरुवर्य बा. ह. नाईकवाडी आणि मातोश्री दुर्गाबाई नाईकवाडी यांच्या कार्याला अभिवादन केले. त्यांच्या विचारांचे जतन व प्रसार करण्यासाठी अशा हस्तलिखितांची आवश्यकता आहे. त्यांच्या कार्यातून शिक्षणासोबतच समाजाप्रती कर्तव्यभावना आणि संस्कारांचे महत्त्व अधोरेखित होते, असे मत अगस्ती विद्यालयाचे माजी प्राचार्य भाऊसाहेब पारदे यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमास संस्थेचे कार्यवाहक शिरीष नाईकवाडी, सतीश नाईकवाडी, भाऊसाहेब पारदे, संपतराव नाईकवाडी, भानुदास पोखरकर, विद्यालयाचे मुख्याध्यापक संजय शिंदे, उपमुख्याध्यापक तात्यासाहेब, पर्यवेक्षक नंदा गोपाळे यांच्यासह अनेक आजी–माजी मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे वातावरण प्रेरणादायी व भावनिक होते. शेवटी उपस्थित मान्यवर तसेच सहकार्य करणाऱ्या सर्वांचे आभार मानण्यात आले.

## संत सावता महाराजांचे कार्य आजही प्रेरणादायी
### गणेश गायकवाड महाराज | संत सावता महाराजांचा समाधी सोहळा उत्साहात

● **पाथर्डी । वीरभूमी –**

संत सावता महाराजांनी कर्म हीच पूजा मानून ईश्वराने नियत केलेले कर्म उदात्त भावनेने केल्यास परमेश्वराचे अधिष्ठान दूर नाही, असा संदेश दिला. देव भक्तीचा भुकेला असल्याने त्याला अन्य काहीही लागत नाही. कृषी क्षेत्राला ईश्वरी अधिष्ठान देत संत सावता महाराजांनी केलेली सेवा आजच्या काळातही तितकीच महत्त्वाची आहे, असे मत गणेश गायकवाड महाराज यांनी व्यक्त केले.



संत सावता महाराज यांच्या ७३१ व्या समाधी सोहळ्यानिमित्त मोहन सुडके महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संत सावता महाराज भाविक व महिला भजनी मंडळच्या वतीने दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कसबा विभागातील संत सावता महाराज मंदिरात हा सोहळा पार पडला. मुख्यदिवशी महापूजा, चरित्र वाचन, ग्रामप्रदक्षिणा मिरवणूक आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. आमदार मोनिका राजळे यांच्या हस्ते मिरवणुकीचे उद्घाटन झाले. त्यांनी संत सावता महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले. यावेळी नगराध्यक्ष अभय आव्हाड, उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, नंदकुमार शेळके, ॲड. प्रतीक खेडकर, बजरंग घोडके, डॉ. जगदीश मुने, प्रतीक नांगरे, मंगल सोनटक्के, सिंधुताई साठे आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते.

संत सावता महाराज महिला भजनी पथकाने मिरवणुकीत उत्कृष्ट सादरीकरण करून शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले. संपूर्ण मिरवणूक मार्गावर सडा–रांगोळीने सजावट करण्यात आली होती. ठिकठिकाणी भाविकांनी संत सावता महाराजांच्या प्रतिमेचे पूजन केले. भजनी मंडळाने विविध धार्मिक कार्यक्रमांत रंगत आणली. उत्सव समितीतर्फे मान्यवरांचा सन्मान करण्यात आला. मिरवणूक मार्गावर रामभाऊ बंग मित्र मंडळ, अशोक साठे परिवार, बाळासाहेब ईधाटे यांच्यासह अन्य मान्यवरांनी भाविकांना पिण्याचे पाणी, सरबत, केळी वाटप केले.

गायकवाड महाराज म्हणाले, सत्संगती जीवनात कधीही नैराश्य येऊ देत नाही. संतांनी लोककल्याणाचा ध्यास घेत ईश्वराकडे लोककल्याणाचे साकडे घातले. ‘कांदा मुळा भाजी, अवघी विठाई माझी’ हा अभंग भक्तीरसाचे उत्कट प्रतीक आहे. शेती हा जगातील सर्वांत पवित्र व्यवसाय असून, मनापासून शेती करणाऱ्या व्यक्तीला पदोपदी ईश्वरी अस्तित्वाची प्रचिती येते. पानाफुलांत, फळांच्या चवीत आणि पीक–पाण्याच्या उत्पादनातून ईश्वराचे दृश्य रूप अनुभवता येते; मात्र ते पाहण्याची दृष्टी संत देतात. त्यामुळे शेतीला ईश्वरी सेवा म्हणून प्रतिष्ठा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य संत सावता महाराजांनी केले, असे त्यांनी सांगितले. उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी आप्पा तुपे, रमेश गोरे, पांडुरंग सोनटक्के, रायभान सोनटक्के, लक्ष्मण डोमकावळे, आदिनाथ डोमकावळे, बाळासाहेब सोनटक्के, अरविंद सोनटक्के, गणेश तात्या सोनटक्के, राजेंद्र सोनटक्के, अशोक सोनटक्के, दीपक गादे, पप्पू सोनटक्के, आदित्य डोमकावळे, राजेंद्र दुधाळ, बबन सोनटक्के, रोहित पुंड, भाऊ तुपे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# श्री रेणुकामाता मल्टिस्टेटच्या विश्वास व नियोजनाला तोड नाही
### शांतीब्रह्म आदिनाथ महाराज शास्त्री | अमरापूर येथे श्री रेणुकामाता मल्टिस्टेटच्या कर्मचाऱ्यांचा स्नेहमेळावा

● **शेवगाव । वीरभूमी –**

कोणत्याही क्षेत्रात काम करताना विश्वास अत्यंत महत्त्वाचा असतो. विशेषतः आर्थिक क्षेत्रात त्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. प्रशांत भालेराव यांनी श्री रेणुकामाता मल्टिस्टेटच्या देशभरातील शाखांमधील आर्थिक व्यवहारातून लाखो सभासदांमध्ये विश्वास निर्माण केला आहे. त्यामुळे संस्थेच्या प्रगतीचा डंका साता समुद्रापार पोहोचला आहे. या यशामागे डॉ. भालेराव यांचे अपार कष्ट व जबरदस्त नियोजन असल्याचे प्रतिपादन तारकेश्वर गडाचे महंत शांतीब्रह्म आदिनाथ महाराज शास्त्री यांनी केले.



श्रीक्षेत्र अमरापूर येथे श्री रेणुकामाता मल्टिस्टेटच्या १५ शाखांतील सेवकांच्या स्नेहमेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी हनुमान टाकळीचे महंत रमेश आप्पा महाराज, पाथर्डीचे प्रथम नगराध्यक्ष सुभाष घोडके, श्रीमंत घुले, डॉ. अरविंद पोटफोडे, प्रा. जनार्दन लांडे पाटील, देवस्थानचे पुजारी तुषार देवा, रमेश देवा भोंग, संस्थेचे कार्यकारी अधिकारी हरिश्चंद्र मोरे, वरिष्ठ व्यवस्थापक राजेंद्र नांगरे व अश्वलिंग जगनाडे, प्रशासकीय अधिकारी कार्तिक पुनगुंटीवार, पोपट काळे, दिनेश टकले, लेखापरीक्षक सचिन जाखडे, रवींद्र आढाव, गजानन वाघ, अक्षय शिंदे, भाग्यश्री राऊत यांच्यासह विविध शाखांतील सेवक उपस्थित होते.

महंत रमेश आप्पा महाराज म्हणाले, या कार्यक्रमाला प्रथमच उपस्थित राहण्याचा योग आला. मात्र, या सोहळ्याचा उद्देश आणि येथील कार्यपद्धती पाहून मी भारावून गेलो आहे.

श्री रेणुकामाता मल्टिस्टेटच्या १४१ शाखांपैकी टप्प्याटप्प्याने १० ते १५ शाखांतील कर्मचाऱ्यांचे स्नेहमेळावे राज्यातील सोयीच्या ठिकाणी आयोजित केले जातात. यावेळी दैनंदिन कामकाजाचा आढावा घेऊन शाखांच्या अडचणींबाबत मार्गदर्शन केले जाते. प्रत्येक मेळाव्यात उत्कृष्ट काम करणाऱ्या पाच शाखांची निवड करून त्यांना अनुक्रमे १५, १० व ७ दिवसांचे वेतन पारितोषिक म्हणून देऊन गौरविण्यात येते. नुकत्याच झालेल्या मेळाव्यात नाशिक शाखेतील कर्मचाऱ्यांना १५ दिवसांचे, पुणे शाखेतील कर्मचाऱ्यांना १० दिवसांचे, तर सिन्नर, कर्जत व पिंपळगाव बसवंत शाखेतील कर्मचाऱ्यांना प्रत्येकी ७ दिवसांचे वेतन पुरस्कार म्हणून देण्यात आले.

डॉ. भालेराव म्हणाले, श्री रेणुका माता मल्टिस्टेट आपल्या सेवकांना अन्य संस्थांच्या तुलनेत अधिक सुविधा देत असून, शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे विविध लाभ दिले जातात. संस्थेत कायम झालेल्या सेवकांना पीएफ व सेवानिवृत्ती वेतन मिळते. नुकत्याच निवृत्त झालेल्या सेवकांना प्रत्येकी २० लाख रुपये ग्रॅच्युइटी आणि ७ हजार ५०० रुपये सेवानिवृत्ती वेतन मिळत आहे.

सेवानिवृत्त कर्मचाऱ्याच्या निधनानंतर त्याच्या वारस पत्नी किंवा पतीला ३ हजार रुपये, तर दोन अपत्यांना त्यांच्या वयाच्या २०व्या वर्षापर्यंत प्रत्येकी ७५० रुपये दिले जातात. गरोदर महिलांना सहा महिन्यांची हक्काची पगारी रजा, कायम कर्मचाऱ्यांचा विमा तसेच आजारपणासाठी एक कोटी रुपयांपर्यंत आरोग्य विम्याचा लाभ दिला जातो. या विम्याचा लाभ कर्मचारी, त्याचा पती किंवा पत्नी, मुले तसेच आई–वडिलांच्या आजारपणासाठीही घेता येतो.

याशिवाय सेवकांच्या पाल्यांच्या उच्च शिक्षणासाठीही संस्था आर्थिक मदत करते. सेवकांच्या कामाचे नियमित मूल्यमापन करून चांगल्या कार्याला गुण व त्यानुसार इन्सेन्टिव्ह दिला जातो. नियमित वेतनाव्यतिरिक्त दरमहा एक लाख रुपयांपर्यंत इन्सेन्टिव्ह मिळविणारे अनेक सेवक संस्थेत आहेत. स्नेहमेळाव्यातील पुरस्कारांव्यतिरिक्त दरवर्षी वार्षिक मेळाव्यात ६१ लाख रुपयांची रोख पारितोषिके मान्यवरांच्या हस्ते देऊन सेवकांचा गौरव केला जातो.

मात्र, चुकीला दंडही केला जात असून हा दंड सेवक कल्याण निधीत जमा करण्याचा पायंडा आहे. एकूणच श्री रेणुका माता मल्टिस्टेट ही सेवककेंद्रित तसेच सामाजिक उत्तरदायित्व जपणारी संस्था असल्याचे डॉ. भालेराव यांनी स्पष्ट केले.

वीरभूमी हे पत्रक मालक, मुद्रक व प्रकाशक– महादेव एकनाथ दळे यांनी आदिनाथ प्रिंटिंग प्रेस, कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर, ४१४५०५ येथे मुद्रित करून तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर–४१४१०६ येथे प्रसिद्ध केले.
✻ संपादक– महादेव दळे, पत्ता– कासार पिंपळगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर मो. ९४२०८०२१४५ Email - mahadevdale@gmail.com वेबसाईट : www. veerbhuminews.com

# SPOT NEWS

## राजूर पोलिसांकडून 'ऑल आउट ऑपरेशन'मध्ये कारवाई

● **अकोले । वीरभूमी–**

राजूर पोलिस ठाण्याच्या हद्दीत 'ऑल आउट ऑपरेशन'दरम्यान विविध ठिकाणी नाकाबंदी करून पोलिसांनी कारवाई केली. यावेळी ड्रंक अँड ड्राइव्ह तसेच वाहन चालविण्याचा परवाना न बाळगल्याप्रकरणी एकावर कारवाई करण्यात आली. विनापरवाना वाहतूक करणाऱ्या १६ वाहनांवर कारवाई करून १२ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच जुगार अड्ड्यावर धाड टाकून तीन आरोपींना अटक करण्यात आली. नॉन–बेलेबल वॉरंटअंतर्गत १८ समन्स बजावून सात आरोपींना अटक करण्यात आली. तसेच आणखी १० बेल वॉरंट व समन्स बजावण्यात आले. ही कारवाई पोलीस अधीक्षक राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे व विभागीय पोलीस अधिकारी डॉ. कुणाल सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली राजूर पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली.

## लक्ष्मीआई यात्रा उत्सवाची शहरात रंगली मिरवणूक

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

आषाढ अमावस्यानिमित्त शहरातील रामवाडी येथे लक्ष्मीआई यात्रा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. रामवाडी परिसरातून पारंपारिक वाद्यांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली होती. घोड्यांच्या बग्गीत असलेल्या लक्ष्मीमातेच्या मूर्तीने सर्वांचे लक्ष वेधले. भंडाऱ्याची उधळण व लक्ष्मीमातेचा जयघोष करीत भाविक मोठ्या संख्येने मिरवणुकीत सहभागी झाले होते. आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली नगरसेवक मोहित पंजाबी व सागर मुर्तंडकर यांच्या हस्ते नारळ वाढवून यात्रेच्या मिरवणुकीला प्रारंभ करण्यात आला. यावेळी मिरवणुकीत प्रकाश वाघमारे, सागर साठे, पप्पू पाटील, अश्विन खुडे, दीपक सरोदे, दीपक साबळे, सतिश साळवे, सुरेश वैरागर, कुणाल डाके, दीपक लोखंडे, किशोर उल्हारे, बंटी साबळे, पप्पू पाथरे, गणेश ससाणे, अजय केंजरला, मयूर चखाले, अमित कांबळे, राजू दिवटे आदींसह युवक व भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दरवर्षी लक्ष्मीआई यात्रा मोठ्या उत्साहात साजरी केली जात असून, ५० ते ६० वर्षची या यात्रेला परंपरा आहे. युवकांनी प्रवरा संगम येथून कावडीने आणलेल्या जलने रामवाडी येथील लक्ष्मी मातेच्या मुर्तीला अभिषेक घालण्यात आला. विधीवत पूजा करुन लक्ष्मीमातेच्या उत्सवमूर्तीची मिरवणूक शहरातून काढण्यात आली. भाविकांसह युवकांनी भक्तीगीतांवर ठेका धरला होता. पारंपारिक वाद्यांनी संपूर्ण परिसर दणाणून निघाला. ही शोभायात्रा कोठला, मंगलगेट, सर्जेपूरा, रंगभवन येथून मार्गक्रमण होऊन रामवाडी येथे तिचा समारोप झाला. तसेच यात्रेच्या आदल्यादिवशी रामवाडीत यात्रेनिमित्त भंडाऱ्याचे प्रारंभ उपमहापौर धनंजय जाधव, जय भोसले व सुनिल उमाप यांच्या हस्ते करण्यात आले. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या नागरिकांनी भंडाऱ्याचा लाभ घेतला.

## पाच दिवसीय बँकिंग आठवड्यासाठी बँक कर्मचाऱ्यांचे जोरदार आंदोलन

● **अहिल्यानगर । वीरभूमी–**

पाच दिवसीय बँकिंग आठवडा लागू करण्याच्या मागणीसाठी युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सच्या देशव्यापी आवाहनानुसार अहिल्यानगरातील बँक कर्मचारी व अधिकाऱ्यांनी प्रोफेसर चौकातील युनियन बँकेसमोर निदर्शने केली. बाराव्या द्विपक्षीय करारात इंडियन बँक्स असोसिएशनने पाच दिवसीय बँकिंगला तत्त्वतः मान्यता दिली असतानाही केंद्र सरकारने अद्याप निर्णय घेतला नसल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. पाच दिवसांचा आठवडा आमचा हक्क अशा घोषणा देत कर्मचाऱ्यांनी सरकारच्या वेळकाढू धोरणाचा निषेध केला. मागणीवर लवकर निर्णय न घेतल्यास णत्रइणच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन व संपाचा इशारा देण्यात आला. या निदर्शनांमध्ये कॉ. संदीप सरोवरे, कॉ. सागर तनपुरे, कॉ. सचिन शिरसाठ, कॉ. प्रकाश कोटा, कॉ. शशांक नवले, कॉ. महेश पंडित, कॉ. समीर डांगवळे, कॉ. सुरज गाडे, कॉ. अमोल पवार, कॉ. कीर्ती जोशी, कॉ. अमोल बर्वे, कॉ. उमाकांत कुलकर्णी, कॉ. राजेंद्र बेरड, कॉ. पल्लवी लोखंडे, आणि कॉ. प्रतीक्षा गवळी यांच्यासह अनेकांनी आपले मनोगत व्यक्त केले. आंदोलनात महिला कर्मचाऱ्यांसह शहरातील विविध बँकांमधील कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# श्रीगोंदा रेल्वे स्थानकावरील राख प्रकरण न्यायाधिकरणात

**। पर्यावरणीय हानीच्या आरोपांची दखल राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाकडून संबंधितांना नोटीस**
**। प्रदूषण नियंत्रण मंडळाने मात्र दरमहा ६० हजार टन राख हाताळण्यास दिली संचालनाची संमती**

■ **विजय उंडे**

● **श्रीगोंदा । वीरभूमी –**

श्रीगोंदा रेल्वे स्थानकावर सुरू असलेल्या दगडी कोळशाच्या राखेच्या वाहतूक व साठवणुकीच्या प्रश्नाला आता न्यायालयीन वळण मिळाले आहे. पर्यावरणीय हानीच्या आरोपांवर दाखल करण्यात आलेल्या अर्जाची राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या पुणे खंडपीठाने दखल घेतली असून, संबंधित प्रतिवादींना नोटीस बजावण्याचे आदेश दिले आहेत.

अर्जदारांच्या म्हणण्यानुसार, श्रीगोंदा रेल्वे स्थानकाच्या मालवाहतूक परिसरात मोठ्या प्रमाणावर दगडी कोळशाची राख उतरवून तिची साठवणूक व पुढील वाहतूक केली जात आहे. या प्रक्रियेमुळे परिसरातील हवा, पाणी, शेती आणि नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचा दावा अर्जात करण्यात आला आहे. कांदा पिकांचे नुकसान झाल्याचेही अर्जदारांनी नमूद केले आहे.

या प्रकरणात संबंधित कंपन्यांकडून राखेची वाहतूक व साठवणूक आवश्यक पर्यावरणीय परवानग्यांशिवाय आणि अवैज्ञानिक पद्धतीने होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच पर्यावरणाची झालेली हानी भरून काढण्यासाठी 'प्रदूषक भरपाई तत्त्वानुसार' पर्यावरणीय नुकसानभरपाई वसूल करावी, परिसर पूर्ववत करावा आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

प्रकरणातील महत्त्वाची बाब म्हणजे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने १३ मार्च २०२६ रोजी वाय ॲश ट्रेडस्फिअर एलएलपीला राख उतरवणे, साठवणे आणि वाहतूक करण्यासाठी संचालनाची संमती दिली आहे. या आदेशानुसार संबंधित संस्थेला




कोळशाची राख हाताळण्यास परवानगी देण्यात आली आहे. संबंधित प्रकल्पाची भांडवली गुंतवणूक २.८ कोटी रुपये असल्याचे आदेशात नमूद आहे. मात्र ही परवानगी अनेक पर्यावरणीय अटींच्या अधीन आहे. राखेची साठवणूक बंद शेडमध्ये करणे आणि वाहतूक बंद मालवाहू वाहनातून करणे बंधनकारक आहे. राख हाताळताना निर्माण होणारी धूळ रोखण्यासाठी पाण्याचे फवारे किंवा धुक्याची फवारणी करणारी यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. तसेच राख साठवणुकीच्या ठिकाणी सिमेंट–काँक्रीटचा पक्का तळ आणि सांडपाणी संकलन व्यवस्था करण्याची अट आहे. याशिवाय संबंधित संस्थेने ३१ डिसेंबर २०२१ रोजीच्या राख व्यवस्थापन अधिसूचनेचे आणि त्यातील सुधारित तरतुदींचे पालन करणे बंधनकारक आहे.

प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आदेशात हवेतील निलंबित धूलिकणांचे प्रमाण १५० मिलीग्रॅम प्रतिघनमीटरपेक्षा अधिक नसावे, अशी मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. प्रदूषण नियंत्रणाच्या २०२८पर्यंत वैध आहे. मात्र या संमतीमुळे इतर शासकीय विभागांकडून आवश्यक असलेल्या परवानग्या किंवा ना–हरकत प्रमाणपत्रांची आवश्यकता संपत नाही. अटींचे उल्लंघन झाल्यास प्रदूषण नियंत्रण मंडळाला संमतीचे पुनरावलोकन करून ती स्थगित अथवा रद्द करण्याचा अधिकार आहे. एकीकडे राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणासमोर पर्यावरणीय हानीचे आरोप करण्यात आले आहेत, तर दुसरीकडे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संबंधित संस्थेला ठरावीक अटींसह राख हाताळण्याची संचालनाची संमती दिली आहे. त्यामुळे बंद वाहनातूनच राखेची वाहतूक होते का, बंद शेडमध्येच साठवणूक केली जाते का, धूळ नियंत्रणाची यंत्रणा प्रत्यक्ष कार्यरत आहे का आणि मंजूर मर्यादेपेक्षा अधिक राख हाताळली जात नाही ना, याची प्रत्यक्ष तपासणी होणे महत्त्वाचे ठरणार आहे.

### राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणासमोर काय मागण्या?

■ अर्जदारांनी संबंधित राख वाहतूक व साठवणुकीचे काम बंद करावे, पर्यावरणाची झालेली हानी भरून काढण्यासाठी नुकसानभरपाई आकारावी, परिसर पूर्ववत करावा तसेच शेती, पिके, जनावरांचा चारा व पाण्याच्या नुकसानीबाबत भरपाई द्यावी, अशी मागणी केली आहे.

### पुढील सुनावणी २३ जूनला

■ राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने संबंधित प्रतिवादींना नोटीस बजावून त्यांना उत्तर दाखल करण्याचे निर्देश दिले आहेत. अर्जदारांनी आवश्यक कागदपत्रे प्रतिवादींना देण्याचेही निर्देश आहेत. या प्रकरणाची पुढील सुनावणी २३ जून २०२६ रोजी होणार आहे.

### नागरिकांच्या प्रश्नांकडे लक्ष

■ श्रीगोंदा रेल्वे स्थानक परिसरातील राखेच्या वाहतूक व साठवणुकीबाबत नागरिक, शेतकरी आणि पर्यावरणप्रेमींकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या पार्श्वभूमीवर संबंधित यंत्रणांनी पर्यावरणीय परिणामांची तसेच प्रदूषण नियंत्रण मंडळाने घातलेल्या अटींच्या प्रत्यक्ष पालनाची निष्पक्ष तपासणी करावी, अशी मागणी होत आहे.

# शेतकऱ्यांनी कांदा फक्त पिकवायला नाही, तर विकायलाही शिकले पाहिजे

**आडत व्यापारी राजू बेलोटे यांचे आवाहन**

● **पारनेर । वीरभूमी –**

येत्या काळात कांद्याच्या बाजारात चांगली तेजी येण्याचे सकारात्मक संकेत आहेत. सध्या कांद्याचे बाजारभाव दररोज हळूहळू वाढत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला संपूर्ण कांदा एकाच वेळी न विकता टप्प्याटप्प्याने विक्री करावी, असा सल्ला आडत व्यापारी राजूशेठ बेलोटे यांनी दिला.



बाजारात एखाद–दोन दिवस दोन ते चार रुपयांची मंदी आली तरी शेतकऱ्यांनी घाबरून जाऊ नये. कांदा चार महिन्यांत पिकविल्यानंतर त्याची चार ते आठ महिने योग्य पद्धतीने साठवणूक केली जाते. मात्र विक्रीच्या वेळी मजूर उपलब्ध होत नसल्याने अनेक शेतकरी साठवलेला संपूर्ण कांदा एकाच वेळी ठोक भावाने विकतात. त्यामुळे अपेक्षित आर्थिक फायदा मिळत नाही.

यंदा दोन–तीन राज्यांमध्ये कांद्याचे उत्पादन घटल्याचे दिसत आहे. तसेच पावसामुळे लाल कांद्याची लागवड उशिरा होण्याची शक्यता आहे. या परिस्थितीमुळे चालू वर्षी कांद्याच्या दरात चांगली तेजी राहण्याचा अंदाज आहे, असे बेलोटे यांनी सांगितले.

कांदा विक्री करताना शेतकऱ्यांनी जवळच्या दोन–तीन बाजारपेठांतील दरांची तुलना करावी. ज्या बाजारपेठेत चांगला भाव मिळेल, तेथेच माल पाठवावा. यंदा उष्णतेचे प्रमाण अधिक असल्याने कांदा साठवलेल्या ठिकाणी वेळोवेळी पाहणी करणे आवश्यक आहे. कांद्याची गुणवत्ता खराब होत असल्याचे निदर्शनास आल्यास विलंब न करता माल विक्रीस काढावा, असे आवाहन त्यांनी केले.

'फक्त पिकवायला नाही, तर विकायलाही शिका,' हा कानमंत्र शेतकऱ्यांनी लक्षात ठेवावा. योग्य वेळी योग्य निर्णय घेतल्यास शेतकऱ्यांना त्यांच्या कष्टाचे योग्य दाम मिळतील, असे बेलोटे यांनी स्पष्ट केले.

गेल्या २० वर्षांपासून शेतकरी सेवेत कार्यरत असलेली 'अंबिकामाता ट्रेडिंग कंपनी' ही विश्वसनीय कांदा आडतदार संस्था शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचेही त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी योग्य नियोजन करून कांद्याच्या बाजारभावाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# वांबोरीत खरीप मार्गदर्शनासाठी शेतकरी मेळावा

**कृषी महाविद्यालय विळद घाटच्या वतीने आयोजन । पीक व्यवस्थापनासह विविध योजनांची माहिती**

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

राहुरी तालुक्यातील वांबोरी येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी संलग्न डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनच्या कृषी महाविद्यालय, विळद घाट यांच्या वतीने ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम २०२६–२७ अंतर्गत शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी खरीप हंगामातील पीक व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांना तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळाले.

कार्यक्रमासाठी कृषि मंडळ अधिकारी रामहरी मिसाळ, उपकृषी अधिकारी एस. बी. केळकंदे, सहाय्यक कृषी अधिकारी पी. एस. धांबोरे व प्रवीण भालेराव, प्रा. संदीप डमाळे, प्रा. डॉ. दीपिका मावळे तसेच कृषिमित्र सोमनाथ तोडमल उपस्थित होते.

कृषी महाविद्यालयाचे कार्यक्रम समन्वयक प्रा. के. एस. दांगडे, प्रगतिशील शेतकरी गणेश जवरे, संदीप विधाटे, युवराज पठारे यांच्यासह शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



रामहरी मिसाळ यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती देत शेतकऱ्यांच्या प्रश्नांचे निराकरण केले. प्रा. संदीप डमाळे यांनी डाळिंब पिकावरील कीड व रोग तसेच त्यांच्या एकात्मिक व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. दीपिका मावळे यांनी पिकांची पाण्याची गरज आणि अचूक सिंचन पद्धती याविषयी माहिती दिली.

कार्यक्रमाला माजी जिल्हा परिषद बांधकाम सभापती सुभाषरावजी पाटील, वांबोरीचे सरपंच किरण ससाने तसेच डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फाउंडेशनचे संचालक (तांत्रिक) प्रा. सुनील कल्हापुरे आणि कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. सोमेश्वर राऊत यांचे मार्गदर्शन लाभले.

प्रा. के. एस. दांगडे यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन कृषिदूत प्रणव बानकर यांनी केले, तर सहाय्यक कृषी अधिकारी प्रवीण भालेराव यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कृषिदूत प्रतीक दातीर, यश जाधवार, सुशांत ढमाळे, प्रणव बानकर, सुदर्शन घोरपडे आणि अजिंक्य धवन यांनी विशेष परिश्रम घेतले.

# व्ही. बी.- जी राम जी योजनेचे जिल्हास्तरीय पंचसंमेल

**जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांचे मार्गदर्शन**

● **अहिल्यानगर । वीरभूमी –**

विकसित भारताच्या निर्मितीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ग्रामीण भागातील गरजा, उपलब्ध संसाधने आणि स्थानिक विकासाच्या प्राधान्यक्रमांचा विचार करून ग्रामपंचायत स्तरावर सर्वसमावेशक व विकसित ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणे आवश्यक आहे. व्ही.बी.–जी राम जी योजनेअंतर्गत वैयक्तिक लाभाच्या कामांसोबतच सार्वजनिक स्वरूपाच्या विकासकामांना अधिकाधिक प्राधान्य देऊन ती ग्रामपंचायत विकास आराखड्यात समाविष्ट करावीत, असे मार्गदर्शन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले.

विकसित भारत–जी राम जी (ग्रामीण) अर्थात VB-G RAM-G योजनेबाबत आयोजित जिल्हास्तरीय पंचसंमेलनात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी उपस्थित सरपंच, ग्रामरोजगार सेवक तसेच अधिकारी–कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. ग्रामीण विकासाला अधिक व्यापक दिशा देण्यासाठी ग्रामपंचायत विकास आराखड्याचे प्रभावी नियोजन करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपजिल्हाधिकारी (रोहयो) श्रीमती वर्षा पवार यांनी केले. उपस्थित मान्यवर, सरपंच, ग्रामरोजगार सेवक, अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करण्यात आले.

जिल्हा MIS समन्वयक विकास घिगे यांनी उपस्थितांना व्ही.बी.–जी राम जी




योजनेअंतर्गत ग्रामपंचायतीचा विकास आराखडा तयार करण्याबाबत सविस्तर प्रशिक्षण दिले. यावेळी योजनेच्या प्रमुख तरतुदी, कामांचे नियोजन तसेच योजनेअंतर्गत घेता येणाऱ्या ३१८ प्रकारच्या कामांची माहिती देण्यात आली. व्ही.बी.–जी राम जी योजनेचे महत्त्व अधोरेखित करताना योजनेअंतर्गत पूर्वीच्या १०० दिवसांच्या तुलनेत १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी देण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली. योजनेमध्ये मृद व जलसंधारण, वृक्षारोपण, आपत्ती व्यवस्थापन, सार्वजनिक सुविधा यांसह विविध वैयक्तिक लाभाच्या कामांचा समावेश आहे. त्यामुळे ग्रामपंचायतींनी स्थानिक गरजा आणि उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा विचार करून कामांची निवड करावी, असे मार्गदर्शन करण्यात आले.

गावाच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ वैयक्तिक लाभाच्या कामांपुरते मर्यादित न राहता पाणी, माती, पर्यावरण, सार्वजनिक सुविधा, आपत्ती व्यवस्थापन आणि ग्रामविकासाशी संबंधित सार्वजनिक कामांना प्राधान्य देण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या. अशा नियोजनबद्ध आणि लोकाभिमुख विकास आराखड्याच्या माध्यमातून विकसित ग्रामपंचायती आणि पर्यायाने विकसित भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यावर भर देण्यात आला.

कार्यक्रमात ग्रामविकास अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष तयार केलेल्या विकसित ग्रामपंचायत विकास आराखड्याचे सादरीकरण केले. यामधून ग्रामपंचायत स्तरावर उपलब्ध साधनसंपत्ती, स्थानिक गरजा आणि विकासाची प्राधान्यक्रम निश्चित करून आराखडा कसा तयार करावा, याचे प्रात्यक्षिक उपस्थितांना देण्यात आले.

यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी सुनील गाडे यांनी विशेष सखोल पुनरीक्षण (SIR) बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले. असंकलित मतदारांची यादी (ASDDA गैरहजर, स्थलांतरीत, मयत, दुबार) अहिल्यानगर जिल्ह्याचे संकेतस्थळ रहळश्रूरपरसरी.पळल.ळप व https://ahilyanagar.maharashtra.gov.in/en/notice/special-intensive-revision-program-2026-asdd-voter-lists/ या लिंकद्वारे उपलब्ध होईल. तसेच सदरची यादी संबंधित मतदान केंद्राचे मतदान केंद्रस्तरीय प्रतिनीधी (BLO) यांचेकडेस देखील उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. प्रसिध्द करण्यात आलेल्या ASDD यादीचे अवलोकन करावे. व त्यामध्ये आपले किंवा आपल्या कुटुंबातील सदस्यांचे नाव असल्यास व त्याबाबतचा गणना प्रपत्र/ Enumeration Form स्थानिक मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO)/ स्थानिक तहसिल कार्यालय यांचेकडे दि.१६ ऑगस्ट २०२६ पर्यंत भरुन दिल्यास प्रारुप मतदार यादीत सदर नावाचा समावेश करता येणार असल्याचे त्यांनी सांगितले

कार्यक्रमात उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक (व्ही.बी.–जी राम जी) जिल्हा परिषदचे सुभाष सातपुते, रेशीम विकास अधिकारी संदीप आगावणे, नायब तहसीलदार योगेश कुलकर्णी, कृषी अधिकारी श्रीमती लीना टेमगिरे, कार्यक्रम व्यवस्थापक महेश सरोदे तसेच तालुकास्तरीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ग्रामीण भागातील विकासाला लोकसहभाग, नियोजन आणि उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर यांची जोड देत प्रत्येक ग्रामपंचायतीने प्रभावी विकास आराखडा तयार करावा, या आवाहनासह उपस्थितांचे आभार मानून पंचसंमेलनाचा समारोप करण्यात आला.

# संत नामदेवांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी

**मोहन सुडके महाराज । विश्वेश्वर मंदिरात पुण्यतिथी सोहळा उत्साहात**

● **पाथर्डी । वीरभूमी –**

श्रद्धा, भक्ती, निष्ठा आणि प्रेम यांचे मूर्तिमंत उदाहरण असलेल्या संत नामदेवांचे कार्य सर्वांसाठी प्रेरणादायी आहे. भक्तिमार्गाची खरी ओळख संत नामदेवांसारख्या संतांच्या जीवनपटातून होते, असे मत वारकरी संप्रदायाचे ज्येष्ठ उपासक मोहन सुडके महाराज यांनी व्यक्त केले.

शहरातील विश्वेश्वर मंदिरात संत नामदेवांचे स्थान असून, सालाबादप्रमाणे यंदाही संत नामदेव सेवा मंडळातर्फे पुण्यतिथी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. मूर्तीचा जलाभिषेक, महापूजा आणि महाप्रसादाने उत्सवाची सांगता झाली. विविध मान्यवरांनी उपस्थित राहून संत नामदेवांच्या प्रतिमेचे पूजन केले. विश्वेश्वर मंडळाच्या कार्यकर्त्यांनी उत्सवाच्या आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी नामदेव शिंपी समाजाचे अध्यक्ष डॉ. सुहास उरणकर, समाजकार्यकर्ते संजय कल्याणकर, पांडुरंग बाचल, सेवानिवृत्त प्राचार्य भगीरथ उरणकर, विलास उरणकर, अमोल उरणकर, नितीन उरणकर, संजय सातपुते, भास्कर वनारसे, मिलिंद वनारसे यांच्यासह ज्येष्ठ नगरसेवक नंदकुमार शेळके, माजी नगराध्यक्ष डॉ. मृत्युंजय गर्जे, नगरसेवक डॉ. जगदीश मुने, स्वामी समर्थ विद्यालयाचे मुख्याध्यापक एकनाथ ढोले,



माहेश्वरी राम मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. विलास बाहेती आदी मान्यवरांनी नामदेव शिंपी समाजबांधवांना शुभेच्छा दिल्या.

सुडके महाराज म्हणाले, संत नामदेवांनी भारतभर भ्रमण करून पांडुरंग भक्तीचे महात्म्य स्पष्ट केले. वारकरी संप्रदायातील संत कवी म्हणून त्यांना मान्यता मिळाली. त्यांचा जन्म १२७० मध्ये हिंगोली जिल्ह्यातील नरसी येथे झाला. विठ्ठल भक्तीतील त्यांचे श्रेष्ठत्व संत–महंत आणि संप्रदायाने मान्य केले असून, त्यांची शिकवण आचरणात आणण्याचा उपदेश साधकांना केला जातो. त्यांनी मराठी व हिंदी भाषेत अनेक अभंगांची रचना केली.

पंजाबमध्येही त्यांनी भागवत धर्माची पताका फडकवत भक्तीचे महात्म्य स्पष्ट करणाऱ्या अनेक रचना केल्या. अन्य धर्मग्रंथांमध्येही संत नामदेवांच्या रचनांचा उल्लेख आढळतो. जातपात व सामाजिक विषमतेच्या पलीकडे चराचरात पांडुरंगाचे रूप पाहण्याची आणि भक्तिभावाने निर्गुण भक्तीची साधना करण्याची शिकवण त्यांच्या कार्यातून मिळते. त्यांचे काही अभंग शीख धर्माच्या 'गुरु ग्रंथ साहिब'मध्ये समाविष्ट आहेत. यावरून त्यांच्या साधनेचे आणि संत परंपरेतील अधिकाराचे महत्त्व लक्षात येते, असेही सुडके महाराज यांनी सांगितले.

अमोल उरणकर यांनी स्वागत केले, तर डॉ. सुहास उरणकर यांनी मान्यवरांचे आभार मानले.

# राज्यातील शेतकऱ्यांच्या संरक्षणासाठी जलसंपदा विभागाचे काम

## ना. राधाकृष्ण विखे पाटील । पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे मूल्य जपण्याचे प्राधिकारणाच्या कार्यशाळेत आवाहन

**● अहिल्यानगर । वीरभूमी-**

राज्यातील जलसंपदा विभाग अधिक सक्षम, आधुनिक, लोककेंद्री करण्यासाठी २०२९ पर्यंत जलसंपदा विभागाच्या महामंडळांना आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जलसंपदाचा केंद्रबिंदू शेतकरी आणि नागरिक असून, शेतीचे संरक्षण करतानाच शहरांची व उद्योगांची पाण्याची गरज भागविण्यासाठी शाश्वत जलनियोजन करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या २१व्या वर्धापन दिनानिमित्त मुंबईतील वरळी डोम येथील 'द पॅलेस हॉल'मध्ये आयोजित परिसंवाद व कार्यशाळेच्या समारोप सत्रात ते बोलत होते. यावेळी जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या अध्यक्षा श्वेताली ठाकरे, प्राधिकरणाचे आजी-माजी सदस्य, जलसंपदा विभागातील वरिष्ठ अधिकारी तसेच राज्यातील विविध जलविकास संस्थांचे अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलसंपदा विभागासमोर ठेवलेल्या विकासाच्या रोडमॅपनुसार विभागाने काम करणे आवश्यक आहे. 'विकसित महाराष्ट्र २०४७'चे उद्दिष्ट साध्य करताना शेती व्यवसायाला बाधा न आणता त्याचे संरक्षण करूनच शहर व उद्योगांसाठी पाण्याचे नियोजन करावे लागेल, असे मंत्री विखे पाटील यांनी स्पष्ट केले. सिंचनाच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था बळकट करणे, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे आणि उपलब्ध जलसंपत्तीचा शाश्वत वापर करणे ही जलसंपदा विभागाची प्रमुख जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

जलसंपदा विभागाने अनेक वर्षे मोठ्या प्रमाणावर काम केले असले, तरी या कामातून अपेक्षित सामाजिक परिणाम साध्य झाला का, याचेही मूल्यमापन आवश्यक आहे. सिंचन सुविधा निर्माण झाल्यानंतरही ग्रामीण भागातून होणारे स्थलांतर कमी झाले का, शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान व नव्या पिकपद्धतींचा स्वीकार कितपत झाला, याचा विचार करण्याची गरज आहे. यासाठी जलसंपदा आणि कृषी विभागामध्ये अधिक प्रभावी समन्वय आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

जलसंपदा महामंडळांना दीर्घकाळ शासनाच्या निधीवर अवलंबून न ठेवता स्वतःचे आर्थिक स्रोत निर्माण करण्याची गरज आहे. गेल्या वर्षभरात धरणांच्या परिसरातील अतिक्रमणे हटवून सुमारे ५६ हजार एकर जमीन महामंडळांच्या नावावर करण्यात आली आहे. ही जमीन महामंडळांची महत्त्वाची आर्थिक मालमत्ता असून, तिचा सुयोग्य वापर करून प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आर्थिक बळकटी निर्माण करता येईल, असे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

महामंडळांनी महसुलाचे विविध स्रोत निर्माण करावेत. पाणीपट्टीची वेळेत वसुली, पाणीगळती रोखणे आणि पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे मूल्य व उत्तरदायित्व निश्चित करणे आवश्यक आहे. जल वापरातून मिळणारा महसूल वाढल्यास नवीन सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करणे अधिक सुलभ होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

नद्या व कालव्यांचे प्रदूषण रोखण्याची जबाबदारी केवळ प्रदूषण नियंत्रण मंडळाची नसून जलसंपदा विभागाचीही आहे. वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर महानगरांमध्ये वापरलेल्या पाण्यापैकी किमान ८० टक्के पाण्याचा पुनर्वापर करण्याच्या दिशेने ठोस प्रयत्न आवश्यक आहेत. अनेक पाणीपुरवठा योजना नदीच्या पाण्यावर अवलंबून असताना जलप्रदूषण वाढणे ही गंभीर बाब आहे, असेही मंत्री विखे पाटील यांनी नमूद केले.

धरणांमध्ये उपलब्ध पाण्याचे प्रमाण लक्षात घेऊन त्यानुसार पीक पद्धती व लागवडीचे नियोजन करण्यासाठी कृषी आणि जलसंपदा विभागाने एकत्रितपणे काम करावे. उपलब्ध पाण्याच्या क्षमतेनुसार पिकांची निवड केल्यास शेती अधिक बागायती, उत्पादनक्षम आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

जलसंपदा विभागाने राज्याच्या हितासाठी पर्यटन आणि फ्लोटिंग सोलर यांसारख्या उपक्रमांचे धोरण स्वीकारले आहे. या माध्यमातून विभागाच्या मालमत्तेचा आणि जलसाठ्यांचा बहुउद्देशीय वापर करताना त्यातून निर्माण होणारे आर्थिक स्रोत जलप्रकल्पांच्या विकासासाठी उपयोगात आणण्याचे प्रयत्न व्हावेत, असे आवाहन त्यांनी केले.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे काम अत्यंत संवेदनशील असून, प्राधिकरणाने घेतलेल्या प्रत्येक निर्णयाचा व्यापक सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणीय परिणाम लक्षात घेणे आवश्यक आहे. 'कोणाला काय वाटते' यापेक्षा निर्णयाची व्याप्ती, त्याचे संभाव्य परिणाम आणि क्षेत्रीय वास्तव लक्षात घेऊन काम झाले पाहिजे,आशी अपेक्षा मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केली.



जलक्षेत्रातील स्थानिक समस्या आणि क्षेत्रीय विषमता समजून घेण्यासाठी नागपूर, अमरावती, छत्रपती संभाजीनगर यांसह विविध भागांत प्रादेशिक कार्यशाळा आयोजित करण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली. अशा कार्यशाळांमधून शेतकरी, अधिकारी आणि संबंधित घटकांचे प्रश्न प्रत्यक्ष जाणून घेऊन स्थानिक गरजांनुसार उपाययोजना करणे शक्य होईल, असे त्यांनी सांगितले.

जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांनी राज्याच्या वाढत्या जलआव्हानांच्या पार्श्वभूमीवर जलसंपत्तीचे नियोजन, वितरण आणि नियमन अधिक प्रभावी करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान, पारदर्शक कार्यपद्धती आणि विविध यंत्रणांमधील समन्वय आवश्यक असल्याचे सांगितले.

जलसंपत्तीचे न्याय्य, समतोल आणि शाश्वत व्यवस्थापन हे राज्याच्या भविष्यातील विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. शेती, उद्योग, नागरी भाग आणि पर्यावरणीय गरजा यांच्यात समतोल राखण्यासाठी दीर्घकालीन नियोजन आवश्यक आहे. जलवाटपाच्या निर्णयप्रक्रियेत विश्वासार्ह माहिती, जलवापराची कार्यक्षमता आणि स्थानिक गरजा यांचा विचार करून नियमन अधिक संवेदनशील, वस्तुनिष्ठ व लोकाभिमुख करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, सिंचन अनुशेष मोजण्याची वैज्ञानिक व पारदर्शक कार्यपद्धती, पाणी वापर कार्यक्षमता, निधीचे योग्य नियोजन आणि प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या उपाययोजनांवरही परिसंवादात सविस्तर चर्चा झाली. राज्यातील एकूण सिंचन अनुशेषापैकी ९७.९० टक्के अनुशेष दूर करण्यात आला असून उर्वरित अनुशेषही निर्धारित कालमर्यादेत दूर करण्यासाठी नियोजन करण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

कार्यक्रमात जलसंपदा विभागाच्या कार्यात महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या राज्यातील निवडक आजी-माजी अधिकाऱ्यांचा मंत्री विखे पाटील यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे सदस्य (भूजल) डॉ. प्रभात कुमार जैन यांनी आभार मानले.

# राशीन, कर्जतमध्ये तिरंगा रॅलीतून राष्ट्रप्रेमाचा जागर

## विधान परिषद सभापती प्रा. राम शिंदे यांची प्रमुख उपस्थिती

**● अहिल्यानगर । वीरभूमी -**

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत राशीन व कर्जत येथे भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलींच्या माध्यमातून नागरिकांमध्ये देशभक्तीची भावना अधिक दृढ करण्यासोबतच तिरंग्याप्रती सन्मान, राष्ट्राभिमान आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात आला.



कर्जत तालुक्यातील राशीन येथे सकाळी ९.३० वाजता भव्य तिरंगा पायी रॅली काढण्यात आली. हातात तिरंगा ध्वज घेऊन विद्यार्थी, युवक, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी तसेच नागरिक मोठ्या संख्येने रॅलीत सहभागी झाले. यावेळी देण्यात आलेल्या देशभक्तीपर घोषणांनी परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

यानंतर कर्जत शहरात भव्य तिरंगा मोटारसायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये युवक, विद्यार्थी, नागरिक, विविध संस्था व संघटनांचे पदाधिकारी आणि देशप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. तिरंगा ध्वजांनी सजलेल्या मोटारसायकलींसह सहभागी झालेल्या नागरिकांमुळे शहरातील वातावरण राष्ट्रभक्तीने भारावून गेले.

या रॅलीच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाने आपल्या घरावर तिरंगा अभिमानाने फडकवावा, तिरंग्याचा सन्मान राखावा आणि स्वातंत्र्यदिनाचा उत्सव देशभक्ती व राष्ट्रीय एकात्मतेच्या भावनेने साजरा करावा, असा संदेश देण्यात आला.

'हर घर तिरंगा' अभियान हे केवळ ध्वज फडकविण्यापुरते मर्यादित न राहता प्रत्येक नागरिकाच्या मनात राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ करणारे अभियान आहे. या भावनेतून राशीन आणि कर्जत परिसरातील नागरिकांनी रॅलीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत तिरंग्याप्रती असलेला आदर आणि राष्ट्रभक्ती व्यक्त केली.

भव्य तिरंगा रॅलीमुळे कर्जत तालुक्यात स्वातंत्र्यदिनाच्या उत्सवाला उत्साहाचे स्वरूप प्राप्त झाले असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत 'हर घर तिरंगा, हर मन तिरंगा' या भावनेचा जागर केला.

# शेवगाव शहरात तिरंगा यात्रेस उत्स्फूर्त प्रतिसाद

**● शेवगाव । वीरभूमी-**

भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर आमदार मोनिका राजळे यांच्या नेतृत्वाखाली शेवगाव शहरात तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रध्वज हातात घेऊन देशभक्तीपर घोषणा देत विद्यार्थी, माजी सैनिक, महिला, नागरिक, अधिकारी-कर्मचारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने या यात्रेत सहभागी झाले. त्यामुळे शहरातील वातावरण देशभक्तीच्या उत्साहाने भारावून गेले होते.





शहरातील क्रांती चौकातून तिरंगी फुगे आकाशात सोडून यात्रेला प्रारंभ करण्यात आला. भारतमातेची वेशभूषा केलेल्या विद्यार्थिनीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. क्रांती चौकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, संत गाडगेबाबा चौक, पाथर्डी रस्ता मार्गे तहसील कार्यालयापर्यंत तिरंगा पदयात्रा काढण्यात आली. मार्गावर नागरिकांनी यात्रेचे उत्स्फूर्त स्वागत केले.

या यात्रेत आमदार मोनिका राजळे, तहसीलदार आकाश दहाडदे, नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी विजया घाडगे, गटविकास अधिकारी महेश दहिफळे, गटशिक्षणाधिकारी शैलेजा राऊळ, पोलिस निरीक्षक मोहन बोरसे, महेश फलके, नगरसेवक, विविध माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयांतील विद्यार्थी व शिक्षक, माजी सैनिक, महिला, नागरिक तसेच अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले होते.

तहसील कार्यालयाच्या आवारात यात्रेच्या सांगता वेळी आमदार मोनिका राजळे म्हणाल्या, तिरंगा यात्रेचा उद्देश प्रत्येकाच्या मनात देशभक्तीची भावना जागृत करणे आणि राष्ट्रध्वजाबद्दलचा आदर अधिक दृढ करणे हा आहे. देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वातंत्र्यसैनिकांनी मोठा त्याग व बलिदान दिले. त्यांच्या त्यागामुळेच आज आपण स्वातंत्र्य आणि सुरक्षित जीवन जगत आहोत. त्यांच्या बलिदानाची जाणीव ठेवून तिरंग्याचा सन्मान आणि देशप्रेमाची भावना प्रत्येक नागरिकाच्या मनात कायम रुजली पाहिजे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. तहसीलदार आकाश दहाडदे यांनी आभार मानले.

तिरंगा यात्रेमुळे शहरातील नागरिकांमध्ये स्वातंत्र्यदिनाचा उत्साह निर्माण झाला असून, विद्यार्थ्यांमध्येही राष्ट्रप्रेम आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासाविषयी अभिमानाची भावना जागृत झाली.

# 'हर घर तिरंगा'तून सामाजिक एकोपा

## विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या उत्स्फूर्त सहभागाने राहाता दुमदुमले

**● राहाता । वीरभूमी -**

स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर राहाता नगरपरिषद, नगराध्यक्ष आणि सर्व नगरसेवकांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'हर घर तिरंगा' अभियानाच्या भव्य तिरंगा रॅलीला राहाता शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या हस्ते रॅलीचा शुभारंभ झाला. यानंतर डॉ. विखे पाटील यांनी स्वतः तिरंगा हातात घेत शालेय विद्यार्थ्यांसमवेत रॅलीत सहभाग घेतला.







राहाता शहरातील विविध भागातून निघालेल्या या रॅलीत शालेय विद्यार्थी, युवक, महिला तसेच सर्व जाती-धर्मातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले. हातात तिरंगा आणि देशभक्तीच्या घोषणांनी शहरातील वातावरण भारावून गेले होते. स्वातंत्र्यदिन हा कोणत्याही एका जातीचा, धर्माचा किंवा पक्षाचा सण नसून प्रत्येक भारतीयाने एकत्र येऊन साजरा करण्याचा राष्ट्रीय उत्सव आहे, असा संदेश या रॅलीच्या माध्यमातून देण्यात आला.

डॉ. सुजय विखे पाटील यांनी विद्यार्थ्यांसोबत रॅलीत सहभागी होत त्यांचा उत्साह वाढविला. नव्या पिढीमध्ये राष्ट्रध्वजाबद्दल अभिमान, देशभक्ती आणि राष्ट्रीय कर्तव्याची जाणीव निर्माण व्हावी, यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

'हर घर तिरंगा' अभियान केवळ घराघरावर राष्ट्रध्वज फडकविण्यापुरते मर्यादित न राहता तिरंग्याचा सन्मान आणि त्यासंदर्भातील नियम व प्रोटोकॉल प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे, असे डॉ. विखे पाटील यांनी स्पष्ट केले. झेंडा लावल्यानंतर त्याची योग्य पद्धतीने काळजी घेणे, सायंकाळी सन्मानपूर्वक उतरविणे आणि त्याची योग्य प्रकारे जपणूक करणे हीदेखील प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, रॅलीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना डॉ. सुजय विखे पाटील यांनी त्यांच्यावर होणाऱ्या राजकीय टीकेलाही थेट प्रत्युत्तर दिले. काम करण्यासाठी मला कुठल्याही पदाची गरज नाही, असे स्पष्ट करत त्यांनी जनतेशी असलेले आपले नाते पदापेक्षा विश्वासावर आधारित असल्याचे सांगितले.

पुढे बोलताना ते म्हणाले मी कुणालाही बैठकीला बोलवत नाही. मी या तालुक्याचा नागरिक म्हणून नगरपालिकेत आलो आहे. लोक प्रेमापोटी स्वतःहून येत असतील तर त्यांना मी दूर करू शकत नाही. लोकांचं प्रेम कमवावं लागतं, ते विकत घेता येत नाही, असे डॉ. विखे पाटील म्हणाले.

राहाता आणि शिर्डी नगरपरिषदेच्या निवडणुकीचा संदर्भ देताना ते म्हणाले, या निवडणुकीत मी स्वतः जवळपास ८० सभा घेतल्या. त्या वेळी विकासकामांची जी आश्वासने दिली गेली, त्या शब्दांवर लोकांनी मतदान केले असेल, तर ते शब्द पूर्ण होण्याची नैतिक जबाबदारी माझीही आहे. मला काम करण्यासाठी कुठल्याही पदाची आवश्यकता नाही. मी देशाचा नागरिक आहे आणि काम सुस्थितीत व चांगल्या पद्धतीने व्हावे यासाठी प्रयत्न करण्याचा मला पूर्ण अधिकार आहे,असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

महिला आणि मुलींच्या सुरक्षेच्या मुद्द्यावरही डॉ. विखे पाटील यांनी स्पष्ट भूमिका मांडली. महिला सुरक्षित ठेवण्यासाठी कोणत्याही पदावर असणे बंधनकारक नाही. अन्याय होत असेल तर माझ्याकडे असलेली प्रत्येक ताकद वापरून शेवटच्या क्षणापर्यंत मी त्यासाठी काम करत राहणार,असे त्यांनी सांगितले.

एका व्यक्तीच्या वक्तव्याबाबत विचारले असता संबंधित व्यक्तीचा व्हिडिओ आपण पाहिलेला नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मात्र, ज्या पक्षाचे ते पदाधिकारी आहेत, त्या पक्षाचा मी प्रदेश उपाध्यक्ष आहे. त्यामुळे पक्षाचे बोर्ड लावणाऱ्यांनी आणि पक्षाची जाहिरात करणाऱ्यांनी पदाच्या वरिष्ठतेनुसार पक्षाच्या पदाची आणि गरिमेची जाणीव ठेवावी, असा टोला त्यांनी लगावला.

'हर घर तिरंगा' अभियानातून राष्ट्रभक्ती, सामाजिक एकोपा आणि राष्ट्रीय कर्तव्याचा संदेश देतानाच जनतेने दिलेल्या विश्वासाची जपणूक करण्याची भूमिका डॉ. सुजय विखे पाटील यांनी यावेळी स्पष्ट केली. रॅलीतील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग आणि विद्यार्थ्यांचा उत्साह यामुळे राहात्यातील तिरंगा रॅली विशेष ठरली.

# पाथर्डीत आता गाढवांचीही चोरी!

## बाजार समितीच्या आवारातून २२ गाढवे लंपास । आठ ते नऊ लाखांचा माल, चोरटे सीसीटीव्हीत कैद

**● पाथर्डी । वीरभूमी -**

शहरात चोरीच्या विविध घटना घडत असतानाच आता चोरट्यांची वक्रदृष्टी पाळीव प्राण्यांवरही पडल्याचे समोर आले आहे. पाथर्डी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारातील बैल बाजारातून तब्बल २२ गाढवे अज्ञात चोरट्यांनी आयशर टेम्पोत भरून लंपास केली. या गाढवांची बाजारातील किंमत सुमारे आठ ते नऊ लाख रुपये असल्याचे मालकांनी सांगितले. विशेष म्हणजे, गाढवे टेम्पोत भरून नेणारे चोरटे सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले आहेत.

शहराजवळील शिक्षक कॉलनी येथे राहणारे राजेंद्र शंकर पवार व प्रेमनाथ संभाजी जाधव हे वर्षातील सुमारे सहा महिने केज व परळी परिसरातील वीटभट्ट्यांवर गाढव्यांच्या मदतीने विटा वाहतुकीचे काम करतात. त्यांच्या मालकीची २२ गाढवे ६ ऑगस्टच्या रात्री बाजार समितीच्या बैल बाजारात चरण्यासाठी सोडण्यात आली होती.

७ ऑगस्ट रोजी सकाळी सहाच्या सुमारास शंकर पवार बाजार समितीत गेले असता गाढवे जागेवर दिसली नाहीत. परिसरात शोध घेऊनही त्यांचा ठावठिकाणा लागला नाही. त्यानंतर सीसीटीव्ही फुटेज तपासले असता रात्रीच्या वेळी एक आयशर टेम्पो बाजार समितीच्या आवारात येताना दिसला. या टेम्पोत काही व्यक्ती गाढवे भरताना सीसीटीव्ही फुटेजमध्ये स्पष्टपणे दिसत आहेत.

याप्रकरणी पवार यांनी पाथर्डी पोलिस ठाण्यात तक्रार दिली. त्यावरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# 'हर घर तिरंगा'साठी डॉ. अमोल बागुल यांची सलग दुसऱ्यांदा 'तिरंगा स्वयंसेवक' म्हणून निवड

**● अहिल्यानगर । वीरभूमी -**

भारत सरकारच्या संस्कृती मंत्रालयाच्या 'हर घर तिरंगा-२०२६' मोहिमेसाठी दोन राष्ट्रपती पदकांनी सन्मानित शिक्षक डॉ. अमोल बागुल यांची सलग दुसऱ्या वर्षी 'तिरंगा स्वयंसेवक/ॲम्बेसेडर' म्हणून निवड झाली आहे. मीडिया अपलोड उपक्रमात सुमारे आठ लाख स्वयंसेवकांमधून उत्कृष्ट कामगिरी करत त्यांनी देशात पाचवा क्रमांक मिळवला असून, मंत्रालयाकडून त्यांना पाच प्रमाणपत्रे व बॅज प्रदान करण्यात आले. ९ ते १७ ऑगस्टदरम्यान सुरू असलेल्या या मोहिमेचा बॅज जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते डॉ. बागुल यांना देण्यात आला. एआय तंत्रज्ञानाचा वापर करून त्यांनी मोहिमेसाठी वेबपेज, हॅशटॅग, छायाचित्रे, व्हिडिओ व गीते तयार केली आहेत. नागरिकांनी ध्वजसंहितेचे पालन करून तिरंगा सेल्फी मंत्रालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा.